# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०१** दिनांक :- २०/०४/२०२३

ठराव क्रमांक :- ४८३

विषय क्रमांक :- ऐन.

सोबतचे सहा.आयुक्त तथा प्र.मालमत्ता व्यवस्थापक यांचे दि.३१/०३/२०२३ चे विषयपत्र महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १(के) नुसार सर्वानुमते ऐनवेळच्या विषयात दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महापालिका हद्दीमधील सांगली सि.स.नं. १७०/अ/१ माधवनगर रोड येथील महापालिकेच्या खुल्या जागेत शॉपिंग कॉम्प्लेक्स उभारणेत येत असून, सदर ठिकाणी १४ दुकान गाळे बांधण्यात येणार आहेत. त्यामध्ये प्रति दुकाळ गाळा क्षेत्र १४.०९ स्क्वे.मी. (१५१ स्क्वे.फुट) असे असून, सदरचे दुकान गाळे भाडे तत्वावर देणेकामी महापालिकेच्या वतीने ई-लिलाव प्रसिद्ध करणे आलेला होता. त्यानुसार १ ते १४ गाळ्यांसाठी खालील लिलाव धारकांनी उच्चत्तम बोली दिलेली आहे.

| अ.क्र. | लिलावात सहभागी व्यक्तीचे/ संस्थेचे नाव | दुकान गाळा क्रमांक | उच्चत्तम बोली रक्कम |
|---|---|---|---|
| १. | श्री.गणेश राजाराम बेवणूर | १ | ४६३२० |
| २. | श्री.गणेश राजाराम बेवणूर | २ | ४७३२० |
| ३. | श्री.तानाजी सुभ्राव सरगर | ३ | ४६३२० |
| ४. | श्री.सिद्धू पोपट पाटील | ४ | ५०३२० |
| ५. | श्री.दत्ता सहदेव पवार | ५ | ४५३२० |
| ६. | श्री.सिद्धू पोपट पाटील | ६ | ४४३२० |
| ७. | मे.मेघा कन्स्ट्रक्शन,सांगली | ७ | ४४३२० |
| ८. | श्री.दादासाहेब जयवंत सरगर | ८ | ४५३२० |
| ९. | मे.मेघा कन्स्ट्रक्शन,सांगली | ९ | ४४३२० |
| १०. | श्री.दशरथ दादासो दुधाळ | १० अपंग | ४४३२० |
| ११. | श्री.दशरथ दादासो दुधाळ | ११ | ४६३२० |
| १२. | श्री.दशरथ दादासो दुधाळ | १२ | ४४३२० |
| १३. | श्री.दशरथ दादासो दुधाळ | १३ | ४४३२० |
| १४. | श्री.दशरथ दादासो दुधाळ | १४ | ४४३२० |

तरी वरील प्रमाणे ई-लिलाव मधील उच्चत्तम बोली रक्कम दिलेल्या उपरोक्त बोलीधारक यांचेकडून दोन वर्षाचे भाडे अनामत रक्कम भरुन घेवून, ९ वर्षे मुदतीने व दर तीन वर्षाने २०% भाडेवाढ करणेच्या अटीवर व लिलावातील इतर शर्ती-अटीस अधीन राहून भाडेपट्टा करार करुन, सदरचे गाळे भाडेपट्टयाने देणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

तसेच, सदर जागे लगत असलेली सांगली जकात नाक्याची जागा तशीच विना वापराची पडलेली असून, त्यावर अतिक्रमण होत आहे. त्यामुळे सदर लिलावातील लिलावधारकांशी चर्चा केली असता त्यातील मे.मेघा कन्स्ट्रक्शन लिलावधारकांचे नावे वरील लिलावाच्या शर्ती-अटी प्रमाणे व लिलावातील सर्वात जास्तीचे दराप्रमाणे सांगली जकात नाक्याची जागा भाड्याने देण्यास ही सभा मान्यता देत आहे.

उपरोक्त ठिकाणीची जागेची एक वर्षाची मंजूर बोली रक्कम ६० दिवसात रोख अथवा डी.डी.स्वरुपात प्रशासनाने भरुन घेणेस ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- श्री. उमेश पाटील ठराव सर्वानुमते मंजुर

सचिव
मी, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

अनुमोदक :- श्री. अनिल पाटील

महापौर,